मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट पिटीशन क्रमांक ८८२३/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार उच्च न्यायालयात प्रतिभूती ठेव जमा करण्याबाबत.
(८६७४ - शासनाने ठेवलेली प्रतिभूती ठेव)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीएलएस-२०१८/प्र.क्र.१३७/म-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०७ मार्च, २०१९

वाचा :-

१) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक-न्याखभ-१०.०६/प्र.क्र.४६/अर्थसंकल्प-२, दिनांक २९ जुलै, २००६.
२) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक-न्याखभ-२०१५ / प्र.क्र.१३१ / अर्थ-२, दिनांक ३ जून, २०१५.
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्रमांक-सीएलएस-२०१४ / प्र.क्र.११८ /म-३, दिनांक २०.३.२०१४
४) जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे पत्र क्रमांक-२०१८ / मशा /नैआ / जिनिआ / प्र.क्र.३१ / आरआर-३००, दिनांक १.३.२०१९

प्रस्तावना :-

सन २०१४ मधील गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीकरीता मदत न मिळाल्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे श्री. विनोद विष्णुपंत महाडिक व इतर यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रमांक ८८२३/२०१८ मध्ये दिनांक २०.२.२०१९ रोजी दिलेल्या आदेशान्वये न्यायालयात ठेव स्वरुपात रु.२ लाख इतकी रक्कम जमा करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे ठेव स्वरुपात रक्कम जमा करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :-

सन २०१४ मधील गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीकरीता मदत न मिळाल्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे श्री. विनोद विष्णुपंत महाडिक व इतर यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशन क्रमांक ८८२३/२०१८ मध्ये दिनांक २०.२.२०१९ रोजी दिलेल्या आदेशान्वये मा. उच्च न्यायायलात ठेव स्वरुपात रु. २ लाख इतकी रक्कम जमा करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार मा.उच्च न्यायालयात प्रतिभूती ठेव म्हणून जमा करण्यासाठी जिल्हाधिकारी, सोलापूर यांना या शासन निर्णयाद्वारे रुपये २ लाख इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर निधी पुढील अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे :-

अ) शासन निर्णय क्रमांक-सीएलएस-२०१४/प्र.क्र.११८/म-३, दिनांक २०.३.२०१४ मधील तरतूदी विचारात घेवून शासनामार्फत सन २०१४ च्या गारपीटीसाठी दिलेल्या निधीमधून याचिकाकर्त्यास मदत का देता आली नाही याबाबत सरकारी वकीलामार्फत शासनाची बाजू मा. उच्च न्यायालयापुढे मांडण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी, सोलापूर यांची राहील.

ब) प्रस्तुत प्रकरणी जमा केलेली रक्कम शासनाची बाजू विचारात न घेता उचलू नये अशी लेखी विनंती जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी मा. उच्च न्यायालयात करावी.

३. याबाबतीत होणारा खर्च "८६७४-शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी- १०१ - शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी (अ) न्यायालयाकडे जमा केलेल्या प्रतिभूती रकमा "संगणक संकेतांक ८६७४ ००१९" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. वर उल्लेखित लेखाशिर्षाखाली देण्यात आलेली मंजूरी ही अंतरीम आहे. जर मा. उच्च न्यायालयात दाखल रिट पिटीशनचा अंतिम निकाल शासनाच्या बाजूने लागला तर या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली रक्कम मा. उच्च न्यायालयातून काढून त्या रकमेचा भरणा "८६७४-शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती- १०१ - शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती (अ) न्यायालयाकडे जमा केलेल्या प्रतिभूती रकमा" या लेखाशिर्षाखाली करावा लागेल.

५. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाचा निकाल शासनाच्या विरुध्द लागला तर सदरहू रक्कम "मागणी क्रमांक सी-६, २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय, ०२, पूर, चक्रीवादळे इत्यादी १०१, अनुग्रह सहाय (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०५) पिक नुकसानीमुळे शेतकऱ्यांना मदत (२२४५ २४५२) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली जमा दर्शवून खर्च या अंतिम लेखाशिर्षाखाली टाकावा लागेल. त्या परिस्थिती संबंधित जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी आवश्यक रकमेचा मंजूरीबाबतचा रितसर प्रस्ताव शासनास सादर करतील व अर्थसंकल्पीय तरतूदी करुन घेतील.

६. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी रिट पिटीशनचा निकाल लागल्याबरोबर आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी.

७. ज्या प्रकरणी मा. उच्च न्यायालयात अनामत रक्कम भरण्याचे मा. उच्च न्यायालयाचे विवक्षित आदेश नाहीत, अशा प्रकरणी "८६७४- शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी" या लेखाशिर्षाखाली निधी उपलब्ध करता येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

८. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाने शासन निर्णय क्रमांक न्याखभ-१०.०६/प्र.क्र.४६/ अर्थसंकल्प-२, दिनांक २९.६.२००६ अन्वये महसूल व वन विभागास प्रदान केलेल्या शक्तीचा वापर करुन, तसेच वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक-न्याखभ-२०१५/प्र.क्र. १३१/अर्थ-२, दिनांक ३.६.२०१५ अन्वये "८६७४- शासनाने ठेवलेल्या प्रतिभूती ठेवी" या लेखाशिर्षाखाली प्रशासकीय विभागास दिलेल्या अधिकारास अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०७१२३८३२१२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.03.07 12:40:20 +05'30'

(सु.ह. उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
२. जिल्हाधिकारी, सोलापूर.
३. अधिदान व लेखा अधिकारी, सोलापूर.
४. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
६. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर.
८. वि.स. व सह सचिव (म-११), मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुबंई.
९. अवर सचिव / कार्यासन अधिकारी (व्यय-२, अर्थसंकल्प-६, व्यय-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.कक्ष अधिकारी, ब-१/पीएसी/पीएसी-१/कार्यासन म-११, महसूल व वन विभाग, मुंबई.
११.निवड नस्ती कार्यासन म-३.